| MHKO070019102008 | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२३७/२०१०**<br>**मधील नि.क्र.१७० वर आदेश**<br>**दस्तगीर खलीफा –विरुध्द– त्रंबक ढेंगळे पाटील आणि इतर** |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज आरोपी क्र.३ वसंतराव आप्पासाहेब भोसले यांनी पासपोर्ट नुतनीकरणाचा आदेश संबंधीतांना होणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जान्वये आरोपी यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामी यातील फिर्यादी यांनी सदरची फिर्याद आय.पी.सी. कलम ५०० प्रमाणे दाखल केलेली आहे. सदर कामी यातील आरोपी यांना ३१३ चे स्टेटमेंट पर्यंत कायमस्वरुपी गैरहजर राहणेची परवानगी देणेत आलेली आहे. सदर कामी यातील फिर्यादी यांचा पुरावा चालू आहे. यातील आरोपी क्र.३ यांचे नावे व्ही ६९१६७४८ या नंबरचे भारत सरकारचे पासपोर्ट आहे व सदर पासपोर्टचे नुतनीकरण करणेसाठी आरोपी यांनी ता.०४/०३/२०२२ ते ता.०३/०३/२०३२ या १० वर्षांच्या कालावधीकरीता सदरचे पासपोर्ट नुतनीकरण केलेले आहे. सदर पासपोर्ट नुतनीकरण केल्यानंतर संबंधीत कार्यालयाने ता.२५/०४/२०२२ रोजीच्या पत्राने प्रस्तुत आरोपी यांच्या विरुध्द सदरची केस प्रलंबीत असले कारणाने नुतनीकरण का रद्द करु नये याबाबत नोटीस दिलेली आहे. यातील प्रस्तुत आरोपी हे लोकमत मिडीया प्रा.लि. या संस्थेकडे संपादक म्हणुन कार्यरत आहेत व आरोपी यांना सदर संस्थेच्या कामानिमित्त वारंवार परदेशी जावे लागते या कारणाने यातील आरोपी यांना पासपोर्टचे नुतनीकरण होणे गरजेचे आहे व झालेले नुतनीकरण कायम होणे गरजेचे आहे.

०३. यातील प्रस्तुत आरोपी हे राहणेस सांगली येथे आहेत. त्यांची स्थावर व जंगम मालमत्ता आहे. प्रस्तुत आरोपी यांचे पासपोर्टचे नुतनीकरण रद्द झाल्यास त्यांच्या नोकरीवर विपरीत परिणाम होणार आहे. त्यामुळे आरोपी यांच्या पासपोर्टचे झालेले नुतनीकरण कायम होणे गरजेचे आहे. तसेच निर्देश पासपोर्ट ॲथॉरीटी यांना देणे गरजेचे आहे. सबब, आरोपी यांनी सदरचा अर्ज पासपोर्ट नुतनीकरणाकरीता

दाखल केला आहे.

०४. फिर्यादीतर्फे नि.क्र.१७४ ला म्हणणे दाखल करुन असे कथन करण्यात आले आहे की, यातील आरोपीचा अर्ज खोटा, बनावट व कायद्यातील तरतुदी विरुध्द असल्याने तो नामंजुर होण्यास पात्र आहे. सदर आरोपी याने दिलेला अर्ज कायद्यातील कोणत्या तरतुदीनुसार दिला आहे ते नमुद नसल्याने तसेच तशी तरतुद कोणत्याही कायद्यात नसल्याने सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. आरोपीने आपल्या अर्जात त्याने पासपोर्ट नुतनीकरणासाठी अर्ज दिल्याचे, पासपोर्ट नुतनीकरण केल्याचे व नुतनीकरण झाल्यानंतर पासपोर्ट कार्यालयाने नुतणीकरण रद्द का करु नये असे नमुद केले आहे. त्या बाबतीत या फिर्यादींना काही एक माहिती नाही. त्या बाबत कोणताही कागदोपत्री पुरावाही या आरोपीने हजर केला नाही. त्यामुळे त्याबाबत फिर्यादींना काही एक माहिती नाही. आरोपीने काय केले व काय नाही केले याचा व या केसचा काही एक संबंध नाही. सदर आरोपीस या केसमध्ये अर्ज देवुन संबंधीत कार्यालयाविरुध्द निर्देश मागण्याची कोणतीही तरतुद कोणत्याही कायद्यात नसल्याने सदरचा अर्ज मुळातच चालण्यास पात्र नाही.

०५. सदर आरोपीने पासपोर्ट नुतनीकरण कार्यालयाच्या नोटीसीस योग्य तो खुलासा देवुन आपली बाजू मांडणे आवश्यक आहे. त्यावर संबंधीत कार्यालयाने आरोपीने दिलेल्या खुलाशावर निर्णय घेतल्यानंतर सदर आरोपीस योग्य त्या कोर्टात योग्य त्या तरतुदी अन्वये अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. सदरचा अर्ज पाहता आरोपीस नोटीस दिल्याचे नमूद आहे परंतू सदर नोटीसीस आरोपीतर्फे संबंधीत कार्यालयाकडे खुलासा देवुनही त्यांची विनंती अमान्य केली आहे असे कुठेही नमुद नाही. अशा परिस्थीतीत व कायद्याची तरतुद पाहता अशा प्रकारचा अर्ज या कामी देवुन निर्देश मागता येणार नाहीत. त्याचबरोबर मे.कोर्टास असे निर्देश देता येणार नाहीत. सदर आरोपीने सदरचा अर्ज या फिर्यादीस खर्चात टाकण्यासाठी व सदर काम लांबविण्यासाठी दिलेला आहे. त्यामुळे सदर आरोपीस कॉम्पेनसेटरी कॉस्ट होणे आवश्यक आहे.

०६. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरण हे निशाणी वर

युक्तीवादासाठी प्रलंबित आहे. आरोपीस प्रवासासाठी पासपोर्टची आवश्यकता असते त्यासाठी त्यांना पासपोर्ट नुतनीकरण करुन घेणे आवश्यक आहे. आरोपीविरुध्द प्रकरण प्रलंबीत आहे हे कारण प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यास पुरेसे नाही. आरोपी हे दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करणेस तयार आहेत. प्रस्तुतचे प्रकरण हे या न्यायालयात प्रलंबित असल्याने त्या अनुषंगाने या न्यायालयाची परवानगी घेणेही आवश्यक आहे. त्यामुळे आरोपीस सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल करता येतो. तसेच आरोपीने कथन केल्याप्रमाणे त्यांना ३१३ चे स्टेटमेंटपर्यंत कायमस्वरुपी गैरहजर राहण्याची परवानगी आधीच देण्यात आलेली आहे. प्रस्तुतचे प्रकरण हे आरोपी क्र.३ च्या हजेरीसाठी प्रलंबित नाही. आरोपी क्र.३ चा व्यवसाय पाहता त्यास जर परवानगी दिली गेली नाही तर त्यांचे नुकसान होईल. आरोपीने संबंधीतांना आदेश देण्याची विनंती केली आहे. परंतु तसा आदेश संबंधीतांना करणे योग्य होणार नाही. त्यासह या न्यायालयाचे नाहरकत देणे संयुक्तीक वाटत आहे. करीता अर्ज अंशतः मंजूर करणे न्यायोचीत होईल. करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**– आदेश –**

१. प्रस्तुत अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. आरोपीस पासपोर्ट नूतनीकरणासाठी ना–हरकत देण्यात येते. आरोपीने परदेशात जाणेपुर्वी न्यायालयाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. (No objection is hereby granted for renewing the passport.)

३. आरोपीने सदर आदेशाची नोंद घेण्यात यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2025.11.25 17:24:37 +0530

**(अ. त्रिं. मनगिरे )**

दि.२५/११/२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C.,<br>Jaysingpur. |
| Date of Dictation. | 25/11/2025. |
| Judgment/order signed by the PO on | 25/11/2025. |
| Judgment/order uploaded on | 25/11/2025. |